## प्रकरण पहिले

### - भूमिका -

(१) भारतातील धर्मपंथांची परंपरा. (२) महाराष्ट्रातील धर्मपंथ. १. (अ) नाथसंप्रदाय. (ब) नाथसंप्रदायाचे वाङ्मय २. (क) महानुभावपंथ (ड) महानुभावपंथाचे वाङ्मय (इ) महानुभावपंथाचे कार्य. (३) वारकरी संप्रदाय व कार्य. (४) १. दत्तसंप्रदाय २. वाङ्मय. (५) रामदासी संप्रदाय. १. गिरिधर व त्यांचे वाङ्मय. ४. गिरिधरकृत वाङ्मयाच्या अभ्यासाचे प्रयोजन.

# प्रकरण पहिले

## - भूमिका -

### (१) भारतातील धर्मपंथांची परंपरा :

जगातील इतर देशाकडे पाहिले असता अभिमानाने म्हणावेसे वाटते की, आमच्या भारत देशाचा प्राचीन इतिहास हा उज्ज्वल आहे, याचे कारण की येथे अनेक युध्दे झालीत. ग्रीक, हूण, मुस्लीम, इंग्रज इत्यादिकांची परकीय आक्रमणे झाली तरीही भारतीयांचा हिंदूधर्म हा अबाधित राहिला. त्यादृष्टीने भारतीयांची धर्मपरंपरा ही विश्वात आदरणीयच म्हटली पाहिजे. भारताच्या अशोक चक्रांकित छत्रछायेखाली, हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन असे अनेक धर्मपंथीय लोक एकोप्याने नांदताहेत. भारतदेश आजही शांततेचे सा-या विश्वाला आवाहन करीत आहे.

मराठी वाङ्मयाचा कालखंड साधारणपणे ११, १२ व्या शतकापासूनच सुरू होतो. त्या काळीचे वाङ्मय हे साधारणपणे ताम्रपट, शिलालेख इ. त्या माध्यमातून नसते. मराठी वाङ्मयाचा धांडोळा घेताना असे दिसून आले की, ते सर्व धर्मप्रसाराच्या प्रेरणेने, धर्माच्या वृध्दीसाठी, महाराष्ट्रात उदयास आलेल्या निरनिराळ्या, धर्मप्रवर्तकांनी तयार केलेले आहे. या धर्मपंथांचा इतिहास व वाङ्मय पाहताना श्री. ल.रा.पांगारकर म्हणतात की, "इतिहास व वाङ्मय हे जावळ्या फळासारखे एकात्मक आहेत. इतिहास डावलून वाङ्मयाचा विचार करितां येत नाहीं, किंवा वाङ्मयाकडे डोळेझाक करून कोणी इतिहास लिहील तर त्याची ती कृति अपूर्णच राहील." १

हे वरील श्री.पांगारकरांचे विधान अर्थपूर्ण आहे. कारण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यावर लौकरच मुसलमानांची सत्ता महाराष्ट्रावर प्रस्थापित झाली आणि प्रथम बहामनी व नंतर आदिलशाही व निजामशाहीच्या पकडीत सारा महाराष्ट्र सापडला. चंद्रसूर्यांना राहूने ग्रासून टाकावे तशी महाराष्ट्राची स्थिती झाली. तेव्हा मुसलमानी भाषा व संस्कृती यांचा वरचष्मा क्रमाने वाढत गेला.

व त्यांनी हिंदुधर्म आणि संस्कृती यांना जबर धक्के दिले. हे सांस्कृतिक पारतंत्र्य परतवून लावण्यासाठी धर्म व संस्कृती यांचे संगोपन आणि संवर्धन करण्यांत, आमच्या संतकवींनी पुढील काळात परिश्रमांची पराकाष्ठा केली. म्हणूनच आजही भारतातील अनेक धर्मपंथ ऐकोप्याने नांदलेले येथे दिसत आहेत. त्यादृष्टीने भारत हा धर्मसहिष्णु देश असून प्राचीन काळापासून एकच धर्मपंथ असावा व त्याचाच हिरीरीने प्रचार व प्रसार करावा असा आग्रह नसल्यामुळे वेगवेगळ्या कालखंडातून नवीन ऋषिमुनी, धर्मप्रवर्तकांनी आपआपल्या मतानुसार धर्म संप्रदाय निर्माण केले. त्यांच्या त्या धार्मिक प्रेरणेतूनच निरनिराळ्या धर्मपंथांची महाराष्ट्रात उभारणी झाली.

(१) <u>महाराष्ट्रातील धर्मपंथ</u> :

रामायण, महाभारत हे धार्मिक ग्रंथ म्हणजे भारतीयांची परमदैवते होती. किंबहुना धर्माचे अधिष्ठानच त्यांत सामावलेले होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. सर्वसामान्य लोकांनी केवळ प्रपंचात गुंतून न राहता काही परमार्थ साधावा म्हणून निरनिराळ्या संतांनी आपल्या मतानुसार गीताभागवतादि ग्रंथाचा अर्थ लावून अध्यात्मविचाराचा पसारा, काव्याचे माध्यम पत्करून उभा केला आणि त्यांतून धर्मसंप्रदायांची उभारणी केली. प्रकरण तिसरे यांत समर्थसंप्रदायापूर्वी कोण कोणते धर्मसंप्रदाय होते व त्यांचा समर्थसंप्रदायाशी कसा संबंध आला त्यांच्यातील साम्यभेद इत्यादिविषयींची चर्चा आलेली आहे. येथे फक्त त्या संप्रदायांचे स्वरूप व उदय याविषयी सूत्ररूपाने परामर्श घ्यावयाचा आहे.

[अ] १. <u>नाथसंप्रदाय</u> - नाथसंप्रदायाविषयी संशोधकांची निरनिराळी मते आहेत. कुणी ह्या पंथाचा उदय उत्तर भारतात झाला असे प्रतिपादन करतात, तर कुणी दक्षिण भारतातील श्रीशैल्य पर्वतावर प्रथम उदय झाला असे प्रतिपादन करतात. नाथ संप्रदायाची मूळ प्रेरणा परमेश्वरापासूनच (त्रिपुरारी शंकरापासून) मिळाली अशी परंपरा आहे. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या ब्रह्मानंद ह्यांनी आपल्या हठयोग-प्रदीपिकेच्या टीकेत (१-५) सांगितले की, 'आदिनाथ' किंवा 'शिव' हेच सर्वप्रथम नाथ असून ह्या पंथाचे संस्थापक 'नाथ' म्हणजे धनी, मालक किंवा श्रेष्ठ व पंथ म्हणजे मार्ग यावरून

नाथपंथास 'श्रेष्ठांचा मार्ग' असेही म्हणण्याचा प्रघात आहे. या पंथाची अवधूतमार्ग, कानफाटे मार्ग, सिद्धमार्ग अशीही नावे आहेत. संप्रदायातील मूळ मानवी पुरुष मत्स्येंद्रनाथ (शतक ९वे, १०वे) ह्यांच्यासंबंधी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. क्षीरसिंधूच्या परिसरात शंकरांनी पार्वतीला सांगितलेले गुह्यज्ञान मत्स्यरूपाने ऐकले तेव्हा ते निश्चलकाय झाले. नंतर शंकरांनी उदक शिंपडून त्यास दिव्य मनुष्यरूप दिले, अशी आख्यायिका आहे. परंतु काही असले तरी गोरखनाथाचे गुरु म्हणून ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगात -

> आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मत्स्येंद्र तयाचा मुख्यशिष्य ।

मत्स्येंद्राचा निर्देश केलेला आहे --

> मत्स्येंद्रानी बोध गोरक्षाशी केला । गोरक्ष ओळला गहिनाप्रती
> गहिनीप्रसादे निवृत्ति दातार । ज्ञानदेवा सार चोजविले ।।

(अभंग क्र.      )

या पंथाच्या अभ्यासकांनी नाथपरंपरा पुढीलप्रमाणे मांडून दाखविली आहे --

(पुढील पानावर)




[ब] <u>नाथसंप्रदायाचे वाङ्मय</u> :

या संप्रदायाचे उपलब्ध वाङ्मय संस्कृत व हिंदी या भाषेत आहे. कौलज्ञान-निर्णय हा ग्रंथ मत्स्येंद्रनाथांनी लिहिला असून ग्रंथाच्या लिपीवरून हा ग्रंथ ११ व्या शतकापूर्वी लिहिला गेला आहे हे सिद्ध होते.

डॉ.हजारीप्रसाद द्विवेदी यांनी २८ पुस्तकांचे कर्तेपण गोरक्षनाथांकडे दिले आहे. त्यांतील 'अमनस्क', 'अमरौघशासनम', 'गोरक्षपद्धती', 'गोरक्षसंहिता'

'सिद्धसिद्धांतपद्धति' हे संस्कृत ग्रंथ नाथ-तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. हिंदीमध्ये डॉ. बडथ्वाल यांनी 'गोरखबानी' या नावाने जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यात गोरक्षनाथकृत ४० हिंदी पुस्तकांचा उल्लेख असून त्यातही 'सबदी' 'गोरखबोध' वि. पुस्तके महत्त्वाची आहेत.

शिवाय 'अमरनाथ संवाद', 'गोरक्षगीता' हे योगविषयक अनुभवाचे विवरण करणारे ग्रंथ मराठीत आहेत.

गोरक्षनाथांनी आपल्या पंथीयांना योगमार्गाची शिकवण दिली होती. परंतु ज्ञानेश्वरांच्या पितृ घराण्यात 'पंढरीची वारी' चालत आलेली होती. आणि कृष्णभक्ती निवृत्तिनाथांच्या अभंगातून प्रकट झालीच होती. त्या दोहोंचा एक प्रकर्षाने वाहणारा भक्तीचा ओघ ज्ञानेश्वरांच्या ठायी एकरूप झाला. या ओघाला ज्ञानेश्वरांनी आपल्या गीता-टीकेत सर्वाधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिल्याने नाथपंथातील योगमार्गाचा प्रभाव कमी होऊन भक्तिमार्गाचा प्रचंड प्रवाह पुढे वारकरी संप्रदायाच्या रूपाने महाराष्ट्रभर पसरला. मध्ययुगीन इतिहासात प्रभावी असणा-या अनेक धार्मिक संप्रदायांमध्ये या पंथाने आपली स्वतःची अशी काही कामगिरी केली आहे यात शंका नाही.

या पंथाच्या उगमकाली (९वे, १०वे शतक) धार्मिक व सामाजिक अधिकाराची सूत्रे वैदिक धर्मानुयायी व्यक्तींच्या हातात होती. कर्मठ सनातनी मंडळींचा वरचष्मा जिकडेतिकडे दृष्टोत्पत्तीस येत होता. लहानथोर, स्त्रीपुरुष, स्पृश्यास्पृश्य हे भेदाभेद फारच कडक होते. अशा परिस्थितीत नाथ पंथाने आपल्या तत्त्वज्ञानाच्या योगे, आचारधर्मानुसार कैवल्यमुक्तीचे द्वार स्त्रीशूद्रादिकांना खुले करून - पुरुषांपासून स्त्रियांपर्यन्त नि ब्राह्मणांपासून चांडाळापर्यन्त सर्वांना या पंथात येण्यास मुक्तद्वार ठेवले. आपले धार्मिक तत्त्वज्ञान देशी भाषातून सांगण्यास सुरुवात केली.

## १. महानुभाव पंथ

[05] इ.स.च्या १२ व्या शतकात या पंथाचा उगम होऊन या पंथाची १।२

शतके मोठ्या भरभराटीत गेली. ह्या पंथाचे अध्वर्यु चक्रधरस्वामी होत. " या पंथाला 'महात्मा', 'अच्युत', 'जयकृष्णी', 'भटमार्ग', 'परमार्ग' वित्यादी नावे आहेत."२

चक्रधरस्वामी मूळचे गुजरात प्रांतातले असले तरी त्यांचे जीवितकार्य हे महाराष्ट्रातच झाले. 'महाराष्ट्री असावे' हे त्यांचे वचन प्रसिध्दच आहे. जिवांचा उध्दार करीत व ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार ज्ञानमार्गाचा किंवा प्रेममार्गाचा उपदेश करीत त्यांनी विदर्भ, खानदेश, मराठवाडा वि. ठिकाणी जाऊन अखंड जनसेवा केली. महानुभाव पंथाची परंपरा पुढील प्रमाणे आहे -

श्रीदत्तात्रेय
|
द्वारावतीकार चांगदेव राऊळ
|
गुंडम राऊळ उर्फ श्रीगोविंदप्रभु
|
चक्रधर
|
नागदेवाचार्य

[३] महानुभावपंथाचे वाङ्मय
---------------

या पंथाचे वाङ्मयीन कार्य विविध व विपुल आहे. महानुभाव पंथातील खालीग्रंथ, त्यांचे रचनाकार आणि रचनाकाल ही खालीलप्रमाणे आहेत :

१. शिशुपालवध : वि.स. १२७१, भास्करभट्ट बोरीकर
२. एकादशस्कंध : वि.स. १२७४, कवीश्वर भास्कर (उद्धवगीता)
३. वत्सहरण : वि.स. १२७८, दामोदरपंडित
४. रुक्मिणी स्वयंवर : वि.स. १२८८, नरेंद्रकवि
५. ज्ञानबोध : वि.स. १२२१, विश्वनाथ बाळापूरकर
६. सह्याद्रिवर्णन : वि.स. १२२२, रवळोव्यास
७. ऋध्दिपुरवर्णन : वि.स. १२६२, नारोव्यास उर्फ नारायण पंडित बहाळे

या शिवाय आद्य स्त्री कवयित्री म्हणून महदंबा हिचे 'धवळे' आहेत. "मराठी भाषेतील हा आद्य गीतांचा घास फारच गोड आहे."[3] म्हाइंभटकृत लीळाचरित्र व गोविंदप्रभुचरित्र या चरित्रग्रंथांनी मराठी गद्याला प्रतिष्ठित केले.

## महानुभावपंथाचे कार्य

या पंथाचा दृष्टिकोन निवृत्तिपर आहे. प्रवृत्तिवादी नाही. चक्रधरांचा मुखातील शब्द म्हणजे 'श्रीमुखीचे शब्द' त्याला महानुभाव वेदतुल्य मानतात. डॉ. कोलत्यांच्यामते चक्रधर वेदप्रामाण्य मानत नव्हते. चक्रधरांनी ईश्वर हा मोठा मानून ब्रह्माचा अंतर्भाव ईश्वरात केला असल्यामुळे ईश्वराला महत्त्व प्राप्त होऊन देवतांना गौणत्व मिळाले. पंचकृष्णांखेरीज इतर देवतांना त्यांनी तुच्छ लेखले. हा देवता-तीर्थादिकांचा निषेध 'पुरुषोत्तम होत्रा/नावाचे' (सूत्रपाठ आ.मा १२४) या शिष्यांना दिलेल्या आज्ञावरून समजतो.

आतापावेतो वैदिक धर्मात स्त्रीशूद्रादिकांना वेदपठन अगर श्रवणाचा देखील अधिकार नव्हता. चक्रधरांनी आपल्या पंथातून सर्वांना प्रवेश मिळून दिल्यामुळे त्यांच्या अनुयायात नागदेवाचार्यप्रमाणे महदाइसा, उमाइसा, आबाइसा या स्त्रियाही समाविष्ट झाल्या.

चातुर्वर्ण्याला चक्रधराने आपल्या पंथात मान्यता दिली नाही. (सूत्रपाठ आ. ८१)

सोवळ्याओवळ्याची[4] कल्पना महानुभावीपंथीय मानत नव्हते. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही ह्या पंथात संन्यास घेण्याची मुभा होती. आचार धर्मातील आत्यंतिक विरक्तीमुळे कालांतराने महानुभाव पंथाची लोकप्रियता ओसरत गेली.

## १. वारकरी संप्रदाय व कार्य

वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय असलेला संप्रदाय आहे.

"चातुर्वर्ण्याची चौकट न सोडता व कृष्णभक्तीचा गहिनीनाथांचा एक धागा अबाधित राखून महाराष्ट्रातील हरिजन, स्त्री, पुरुष, बाळ वा वृद्ध अशांनी अशा सर्व त-हेच्या मानवप्राण्यांना आपल्या औदार्याने व वात्सल्याने पोटाशी धरून भक्तीच्या राजमार्गाचे हितगुज मोकळेपणाने सांगणारा असा हा श्रेष्ठ पंथ असून त्यामध्ये निर्माण झालेले ज्ञानेशांसारखे थोर संत विश्वकल्याणाची काळजी वाहणारे व आपली मंगल आशीर्वाद-वचने जगावर पसरणारे असे होऊन गेले. त्यांनी अमृतालाहि लाजविणारी अशी अक्षर-वाङ्मयसृष्टि ये मराठीमध्ये नगरी निर्माण करून ठेवली आहे. परदेशियांनीसुद्धा या एकाच कारणाकरिता मराठी भाषेचा अभ्यास करावा इतका तो वैभवसंपन्न केली आहे."[4] या डॉ. पं. रा. मोकाशी ह्यांच्या अभिप्रायातच वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य सामावलेले आहे.

वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलीक या श्रेष्ठ भगवद्भक्तापासून आहे :

"भक्तामाजी अग्रणी । पुंडलीक महामुनी । त्याच्या प्रसादे तरले ।
जड जीव उद्धरले । तोचि प्रसाद आम्हासी । विटेवरी हृषीकेशी।"

असे तुकोबा म्हणतात. संत बहिणाबाईंनी या पंथाच्या कामगिरीचे एका अभंगात अतिशय यथार्थ व समर्पक वर्णन केले आहे. -

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।
जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहेणी फडकती ध्वजा । निरुपण केले ओजा ।।

१३ वे व १४ वे शतक हे ज्ञानदेव-नामदेवांच्या कर्तृत्वाने वैभवसंपन्न असे म्हणता येईल. या दोघांचा स्नेह म्हणजे ज्ञान आणि भक्ति यांचा संगमच होय. ज्ञानदेवाने या वारकरी संप्रदायाचे भव्य मंदिर उभारले आणि नामदेवांनी या संप्रदायाचा विस्तार आपल्या कर्तबगारीने 'पंढरी' पासून पंजाबपर्यन्त नेला. या

पंथाच्या सामाजिक कार्याचे थोरवी सांगताना डॉ.प्र.न.जोशी म्हणतात,
"वेदांच्या मांदियाळी" उभी राहिली तरी त्यांच्याही सीमेपलीकडे असे काही लोक उभे होते की जीव, शिव, आत्मा परमात्मा, पाप पुण्य, द्वैत-अद्वैत, सगुण-निर्गुण इत्यादी जटिल प्रश्नांचा उलगडा त्यांच्या मनात होत नव्हता. या तात्त्विक व पुष्कळ अंशी शाब्दिक जंजाळात त्यांचे चित्त स्थिरावेना. तेव्हा हे तत्त्वविचार ज्या कोणा थोर विभूतींच्या जीवितात साकार झाले असतील, त्यांची सोपी व रसाळ आख्याने, कथानके, ओवी वा अभंग वृत्तातून सांगून पाहण्याची युक्ती या साधुसंतानी अवलंबिली." [१]

यामुळे सर्वसामान्य जनतेला त्यांच्या विषयी आदर वाटून आपल्यासही ऐहिक सुखाचा मार्ग सापडेल व नामकीर्तनाद्वारे कैवल्याचा आनंद लुटता येईल ही आशा वाटू लागली. ज्ञानदेवांनी -

याचे सारे लहान थोर । याति भलते नारीनर । या शब्दात
तर नामदेवांनी "नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगी" या शब्दांनी आपल्या कार्याची रूपरेषाच सांगितली.

सर्व जातीजमातीचे लोक ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीमध्ये सामावून गेले आणि आपआपल्या कुवतीप्रमाणे अभंगरचनांद्वारे निर्भेळ भक्तिरसांत रंगून परमेश्वर प्राप्तीचा उत्कट आनंद भोगू लागले.

पुढील काळांत एकनाथ, तुकाराम, निळोबा इ. सत्पुरुषांनी या भक्तीमार्गाचा आपआपल्यापरीने प्रसार करण्यास हातभार लावला. संत तुकाराम म्हणजे या भागवत मंदिराचा कळसच असे मानले जाते. आजही ह्या संप्रदायाचे महत्त्व अबाधितच राहीले आहे. ज्ञानदेवांची अमृतमधुर गीता-टीका, एकनाथांचे रसाळ भावार्थरामायण आणि एकादश-टीका आणि नामदेव-तुकारामादी संतांची गोड अभंगवाणी ही वारकरी पंथाची वाङ्मयीन कामगिरी सर्वमान्य झालेली आहे.

४. दत्तसंप्रदाय :

(१) वेद व प्राचीन उपनिषद ग्रंथात दत्तदेवतेचा उल्लेख नाही. इ.स.नंतरच्या

पुराण ग्रंथांतून मात्र दत्तात्रेयांचा अुल्लेख व हकीकत येते. दत्तभक्तीची विशिष्ट परंपरा गेली ५०० वर्षे महाराष्ट्रांत चालू आहे. शैव, वैष्णव व शाक्त या तीनही अुपासना प्रवाहात दत्तास मानाचे स्थान आहे. वारकरी, महानुभाव आणि समर्थ या संप्रदायांतही दत्तास मान दिला आहे. अेकनाथांच्या आरतीमध्यें दत्ताच्या स्वरूपाबद्दल पुढील अुद्गार आहेत - "त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुण अवतार त्रैलोक्य राणा" यावरून दत्त या देवतेच्या स्वरूपामध्ये सत्त्व, रज, तम या तीन गुणांचे अैक्यदर्शन व त्रैमूर्ति म्हणजे ब्रह्मा-विष्णु-महेश या तीन देवतांचे अेकवट रूप होय हे स्पष्ट होते.

ह्या संप्रदायाचा अुगमही शंकरापासून (देवता) मानतात. परंतु दत्त-संप्रदायातील अैतिहासिक दृष्ट्या पहिली थोर व्यक्ति म्हणजे श्रीपाद श्रीवल्लभ हे होय आणि नंतरचे महापुरूष म्हणजे नृसिंहसरस्वती. ह्या थोर दत्तसंप्रदायी मंडळींनी दोन मुस्लीम राजवटीत आपल्या योगबलाच्या शक्तीमुळे हीन-दीन, दुःखितांचे दुःख निवारण केले.

(२) <u>गुरूचरित्र</u> :

हा दत्तसंप्रदायाचा प्रमुख धर्मग्रंथ. आजही तो अुच्चवर्णीयांत श्रद्धेने वाचला जातो. दासोपंत यांनी तर प्रचंड ग्रंथरचना केली. त्यांची सारी कविता १-२ लाखांवर आहे. 'गीतार्णव' हा गीता टीकेवरील ओवीबद्ध ग्रंथ आहे. या संप्रदायात पुढे अनेक साधुपुरूष होअून गेले. आजही गुरूवारी दत्ताची अुपासना करणारे पुष्कळ भाविक आहेत.

या पंथाने सांगितलेला आचारधर्म प्रामुख्याने ब्राह्मणवर्गासाठीच असल्याने त्याला बहुजनसमाजात फारशी लोकप्रियता मिळाली नाही. तथापी १४, १५ व्या शतकात या पंथाने हिंदु-मुस्लीम धर्मात सामंजस्य निर्माण करण्याचा धडपड केली ती अुल्लेखनीय आहे.

५. रामदासी संप्रदाय :

अशा त-हेने नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त ह्या संप्रदायांचे स्वरूप व कामगिरी या विषयी थोडक्यांत परामर्श घेतल्यानंतर, १७ व्या शतकात समर्थ-संप्रदायाची उभारणी रामदासांनी कां केली त्याची पार्श्वभूमी पाहू. यादवांचे राज्य नष्ट झाले व त्या बरोबरच महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अस्त होऊन पारतंत्र्य आले. हा पारतंत्र्याचा काळ १४ व्या शतकाच्या सुरूवातीस सुरू होऊन सुमारे १०० वर्षे टिकला. या कालांत मुसलमानी राजसत्तेचा जाच जनतेस सोसावा लागला. देवालये मोडली, तीर्थस्थाने भ्रष्ट झाली, स्त्रियांवर अत्याचार झाले. अशा दुःसह परिस्थितीमध्ये रामोपासनेच्या अधिष्ठानावर करणारा संप्रदाय रामदासस्वामींनी सुरू केला. या आधीच्या वारकरी संप्रदायाने वैदिकाधिष्ठित असलेल्या वर्णाश्रम चौकटीचा भाग अबाधित ठेवून विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानले. रामदासांनी आपल्या भारतभ्रमंतीतून हिंदुसमाजाची केविलवाणी परिस्थिती प्रत्यक्ष अवलोकन केली होती. लोकांचे दुःख हे केवळ धर्मस्थापून दूर होणार नाही तर त्याकरिता स्वराज्याचीही आवश्यकता आहे हे त्यांनी हेरले आणि प्रवृत्तिप्रधान भक्तिमार्गाच्या पायावर आपल्या महाराष्ट्रधर्माची विचारप्रणाली लोकांसमोर ठेवण्यास प्रारंभ केला. शिष्यशाखा तयार करून भारतभर मठस्थापना केली. आराध्यदैवत म्हणून 'श्रीप्रभुरामचंद्र' आणि 'हनुमान' ह्या बलोपासक देवतांचे अधिष्ठान केले. कारण मर्यादा पुरूषोत्तम राम ही देवता, सगळ्या सत्त्वगुणांचा उत्कर्ष असलेली देवता. त्या देवतेला हनुमंतासारखा दास्यभक्तीचा परमोत्कर्ष असणा-या पराक्रमी देवतेचा जोड. या दोन देवता समर्थांच्या प्रतिभेला प्रभावित करत्या झाल्या आणि त्यातून स्फुरले ते रामराज्य. " हे सर्वांच्या कल्याणाचे राज्य व्हावे म्हणून रामनवमीचे व हनुमान-जयंतीचे उत्सव सुरू करून लोकांना कर्तव्यदक्ष केले व राजकारणाशिवाय प्रपंच होत नाही ("प्रपंचा आणे राजकारण") असा उपदेश करून बहुजन समाजाची मते स्वराज्याकडे वळविण्याच्या कामास ते लागले. संप्रदाय स्थापन करण्यात समर्थांचा हेतू हा होता."[६]

रामदासी संप्रदायात पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही पारमार्थिक अधिकार

दिल्यामुळे त्यांनाही मठाधिपती होण्याचा मान मिळाला. मिरजेचे मठात वेणाबाई ह्या प्रमुख होत्या.

(३) गिरिधर व त्यांचे वाङ्मय :

गिरिधर हे रामदासांचे निष्ठावान प्रशिष्य होते. वेणाबाईंच्या शिष्या बाइयाबाई यांचे ते शिष्य. लहान वयातच ते संप्रदायी झाले. समर्थांच्या वाङ्मयाचा अभ्यास त्यांच्या अेवढा कुणीच केला नसेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही. समर्थांचे वाङ्मय सर्वसामान्यास कळावे ह्या हेतूने प्रेरित होवून त्यांनी समर्थांच्या वाङ्मयावर आणि सांप्रदायिक अुपास्यदैवत प्रभुरामचंद्र ह्यांच्यासंबंधी विपुल रचना केलेली दिसते. रामदासांनी आपल्या 'दासबोध' ग्रंथात व्यवहार, राजकारण अित्यादि विषयांचा अुहापोह केल्यामुळे तो व्यवहारकोशाप्रमाणे अुपयुक्त ठरला आहे. त्याविषयी समर्थ म्हणतात,

> जितुकें कांहीं आपणास ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।
> शाहाणे करून सोडावे । बहुत जन ।।दा. १९:१०:१४।।
>
> मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
> तैसे जनास सिकवावें । हळुहळु ।।दा.११:१०:२४।।

परमार्थदृष्ट्या का होओना, पण लोकांना शहाणे करण्यासंबंधातली तळमळ पाहिली म्हणजे अेकप्रकारे समर्थ हे लोकशिक्षणाचे अुत्कट पुरस्कर्ते होते, असे म्हटल्याशिवाय राहावत नाही."[७]

समर्थसंप्रदायांतील दिनकरस्वामी, भीमस्वामी, मेरुस्वामी, आत्माराम अित्यादि कवींनी आपल्या वाङ्मयाद्वारे रामदासांची विचारसरणी लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. गिरिधरांनीही हीच परंपरा पुढे चालू ठेवली. त्यांचा विपुल असा वाङ्मय संभार हा रामदासीसंप्रदायात मोलाची भर घालणारा आहे. त्यांच्या वाङ्मय रचनेकडे पाहिल्यास आपल्या गुरुंचे (समर्थांचे) परमार्थपर विचार त्यांनी आपल्या 'निवृत्तिराम' ह्या ग्रंथांत व 'आत्मानुभाव' ह्या स्फुट

प्रकरणात सुबोध आणि सोप्या अशा भाषेतून लिहिलेले दिसतात. त्यांची ग्रंथान्वय, दासबोधग्रंथराज भावार्थ, इत्यादि प्रकरणे म्हणजे 'दासबोध' हा ग्रंथ सर्वसामान्य जनास कळावा म्हणून केलेली रचना होय. आपल्या गुरुविषयीचे त्यांचे उत्कट प्रेम करुणाराम, गुरुवाबा, देवदर्शन इ. अनेक प्रकरणातून व्यक्त झालेले आहे. आपल्या उपास्यदेवताचे गुणानुवादसंकीर्तन करण्यासाठी गिरिधरांनी पाच ~~सप्त~~ रामायणे, आपल्या सुबोध आणि रसाळ भाषेत लिहून रामायणाची अवीट गोडी वाचकास चाखावयास दिली आहे.

आपल्या गुरुवर सांप्रदायिकांची श्रद्धा अपूर्व असते. त्या दृष्टीने ~~के~~ सद्गुरु महिमा, त्यांची मूर्ति, त्यांचे आचारविचार, जनसामान्यावर प्रभाव, त्यांचे वाङ्मय ह्यासारख्या बारीकसारीक गोष्टींच्या संदर्भात त्यांना कुतूहल असते. त्याकरिता गिरिधर आपल्या गुरुच्या विचारांचे केवळ आधार ग्रंथ लिहून थांबले नाहीतर गुरुच्या आचार-विचारांचे अगदी बारकाईने टिपण करुन त्यांनी 'समर्थप्रताप' ह्या ग्रंथाद्वारे समर्थांची साक्षात् मूर्तीच शब्दरुपात साकार केली आहे.

(क) मध्ययुगीन मराठी वाङ्मयात त्यांनी मोलाची भर घातलेली दिसून येते. मराठीच्या उगमापासून महानुभाव, वारकरी, दत्त ह्या संप्रदायांनी भक्तिपर वाङ्मय निर्माण केले. पुढील काळांत वामनपंडित, निरंजन, एकनाथ, मुक्तेश्वर इत्यादि कवींना आख्यानक काव्याद्वारे मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली. गिरिधरांनीही पाच रामायणे, हरीलीला, कृष्णलीला इत्यादि आपल्या ग्रंथ-कर्तृत्वाद्वारे मराठी वाङ्मयात आपले स्थान निश्चित केले आहे. ~~[illegible]~~, काव्यगुणांच्या दृष्टीने पाहिले तर गिरिधरांची रामायणे मोरोपंत, मुक्तेश्वर यांच्या इतकी गुणसंपन्न नाहीत. परंतु रामाचा महिमा सांगणे, उपास्यदेवता-विषयी लोकांच्या मनात भक्तीची प्रेरणा निर्माण करणे, त्यांना आपल्या देवता-विषयी गोडी लावणे, हे काम त्यांनी आपल्या सुबोध शैलीमध्ये केले आहे. या-शिवाय 'निवृत्तिराम' या पारमार्थिक ग्रंथाद्वारे तत्त्वसिद्धांतांची चर्चा करुन

अद्वैत तत्व अधिक सुबोध करुन सांगणे आणि भक्तिमार्गातील विचार आपल्या स्फुट रचनेद्वारा जनसामान्यांच्या भाषेत लिहिणे या मार्गांनी गिरिधरांनी मराठी भाषेची प्रशंसनीय अशी सेवा केली आहे. आणि म्हणून रामदासी संप्रदायातच नव्हे तर मध्ययुगीन मराठी वाङ्मयातही त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हणावे लागेल. वाङ्मयीनदृष्टीने त्यांचे ग्रंथ पहिल्या श्रेणीचे नसतील पण गुरुविषयी व आपल्या उपास्यदेवतेविषयी भक्तिभाव ओतल्यामुळे त्यांचे वाङ्मय हे वाचनीय झाले आहे.

(४) गिरिधरकृत वाङ्मयाच्या अभ्यासाचे प्रयोजन :

आतापर्यन्तच्या मराठी वाङ्मयाच्या संशोधनाच्या क्षेत्रात नाथ, महानुभाव, वारकरी वित्यादी पंथांच्या वाङ्मयाचा विविधांगी अभ्यास झालेला आहे. तसेच रामदासी संप्रदायाचे अध्वर्यू समर्थ रामदास यांच्या जीवनकार्याचा व वाङ्मयाचा परामर्श वेगवेगळ्या दृष्टिकोनातून घेण्यात आलेला आहे. धुळ्यातील सत्कार्योत्तेजक सभेचे प्रवर्तक के.शं.श्री. उर्फ नानासाहेब देव ह्यांनी आपले सर्व आयुष्यच रामदासी वाङ्मयाच्या संशोधनासाठी वेचले होते. ठिकठिकाणच्या रामदासी मठात जाऊन त्यांनी शेकडो हस्तलिखिते धुळे येथे श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरात संकलीत करुन ठेवली, त्यांचे परिशीलन व संशोधन केले. त्यात समर्थांचे चरित्र व त्यांचे वाङ्मय याविषयीची समीक्षा भरपूर झालेली आहे. तसेच रामदासांच्या प्रमुख शिष्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परामर्श घेण्याचे काही प्रयत्नही आजवर झाले आहेत. "मराठी वाङ्मयाचा वितिहास : खंड तिसरा (रामदास खंड)" या ग्रंथात के. ज.र.आजगांवकर यांनी समर्थांचे वडिलबंधू 'श्रेष्ठ', 'दिनकरस्वामी', 'केशवस्वामी', 'भीमस्वामी' 'वेणाबाबी' प्रभृतींच्या कामगिरीचा धावता परामर्श घेतलेला आहे. श्री.शं.श्री.देवांनीही आपल्या अनेक वर्ष चालविलेल्या रामदास-रामदासी मासिकाद्वारा समर्थ सांप्रदायिकांचे विविध ग्रंथ प्रकाशित केले असून संप्रदायातिल शिष्यांच्या वाङ्मय कर्तृत्वाचा ऊहापोह केलेला आहे. गिरिधरकृत 'समर्थप्रताप' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत के.देवांनी गिरिधरस्वामींच्या विपुल वाङ्मय

संभाराचा परिचय करून दिलेला आहे. ह्या रामदासी शिष्याचा विपुल वाङ्मय संभार असूनही त्याकडे आजवर कोणाचे लक्ष न गेल्यामुळे, या काहीशा उपेक्षित कवीच्या वाङ्मयीन कार्याचे संशोधन करून कितरात त्यांच्या वाङ्मयाचा ~~[illegible]~~ सविस्तर परिचय करून देण्याचा हा एक प्रयत्न केलेला आहे.

. . .

## - संदर्भ -

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, एकनाथ-तुकारामांचा काल,
ले. ल.रा.पांगारकर, प्रवेशिका पृ.१५.

२. महाराष्ट्रातील पांच संप्रदाय : पुरस्कार प्रो.भा.पं.बहिरट,
ले. डॉ. पं.रा.मोकाशी, महानुभावपंथ, पृ. १७.

३. महाराष्ट्र सारस्वत-पुरवणी, डॉ. शं.गो.तुळपुळे, पृ. ८८६.

४. महाराष्ट्रातील पांच संप्रदाय : [वारकरी संप्रदाय]
ले. डॉ. पं.रा.मोकाशी, पृ. ७४.

५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड तिसरा : सं.प्रा.रा.श्री.जोग,
चरित्रवाङ्मय, प्र.८ वे, ले. प्र.न.जोशी, पृ.२६५.

६. समर्थचरित्र [स.रं.] आळतेकरकृत, पृ. २५२.

७. रामदास वाङ्मय आणि कार्य : अनुष्ठान,
ले. न.र.फाटक, पृ. २४७.

. . .